(5)

| | | |
|---|---|---|
| 1. | पुनर्वसित लोकांचे नांवे मुदत ठेव जमा (Fixed Deposit) करण्यात आलेली रक्कम शेतीकरीता चालु खात्यात जमा करण्याबाबत | पुनर्वसित लोकांचे नांवे 6 वर्षाकरीता मुदत ठेव जमा (Fixed Deposit) करण्यात आलेली एकुण रक्कम रु. 5,00,000/- सदर लोक शेती खरेदी करण्याकरीता मुदत ठेव जमा मधुन काढुन चालु खात्यात जमा करण्याबाबत केलेल्या विनंतीनुसार संबंधित तहसिलदार यांचेकडुन प्राप्त अहवालानुसार त्याप्रमाणे आतापर्यंत एकुण 247 लोकांची रक्कम चालु खात्यात जमा करण्याबाबत संबंधित बँकेस कळविण्यात आलेले आहे. तरी त्याप्रमाणे त्या लोकांनी शेती खरेदी केलेली आहे किंवा कसे, याबाबत चौकशी करण्याकरीता वनपरीक्षेत्र अधिकारी, सडक अर्जुनी व तहसिलदार, सडक अर्जुनी यांना निर्देश देण्यात आलेले आहेत. |
| 2 | पुनर्वसनाकरीतां मिळालेल्या अनुदानाबाबतची माहिती | पुनर्वसन करण्याकरीता आतापर्यंत एकुण **34,51,14,000/-** प्राप्त झालेले असुन पुनर्वसित लोकांना देण्यात आलेली रक्कम व सोयी सुविधा पुरविण्याकरीता झालेला खर्च मिळुन एकुण रक्कम रु. **33,50,65,191/-** खर्ची झालेले असुन एकुण रक्कम रु. **1,00,48,809/-** शिल्लक आहेत. तसेच आजपर्यंत एकुण रक्कम रु. **39,91,176/-** व्याज प्राप्त झालेले असुन एकुण रक्कम रु. 28,73,056/- कॅम्पा मध्ये परत केलेले असुंन सध्या एकुण रक्कम रु. 11,18,120/- प्रकल्प अधिकारी तथा उपवनसंरक्षक, गोंदिया यांचेकडे शिल्लक आहेत. |
| 3 | नवनिर्मीत श्रीरामनगर येथिल 9.30 हेक्टर गावांचे क्षेत्र असुन सदर क्षेत्र वाढविण्याबाबत प्रस्ताव तयार करणे | मौजा सौंदड येथे पुनर्वसन करण्यात आलेले क्षेत्र एकुण 9.30 हेक्टर मध्ये (नवनिर्मित श्रीरामनगर या गावामध्ये) ग्रामपंचायत स्थापन करण्याची कार्यवाही होत असल्याने नवनिर्मित श्रीरामनगर येथिल ग्रामसभा सदस्यांकडुन ग्रामसभा ठराव घेवुन सदर गांवी शासन निर्णय दिनांक 05.10.2011 च्या अनुषंगाने गावा लगतचे वनक्षेत्रामध्ये वनसंवर्धन आणि विकासाकरीता संयुक्त वन व्यवस्थापन समिती तयार करुन, वनविभागाच्या सहभागाने वनांचे, वन्यजीवांचे व जैव विविधतेचे संरक्षण, संवर्धन, मृद व जलसंधारण, गावविकास, रोजगार निर्मिती आणि उत्पन्न वाढीबाबत योजना तयार करण्याकरीता या गावाचे क्षेत्र वाढविणे आवश्यक आहे. त्याअनुषंगाने मौजा सौंदड येथिल गावांचे क्षेत्र विभाजीत करुन वन व वनेत्तर क्षेत्र श्रीरामनगर ग्रामसभेचे ठराव घेऊन ग्रामस्थांना वनव्यवस्थापनाकरीता सोपविण्याची कार्यवाही करण्याकरीता विशेष बाब म्हणुन प्रस्ताव तयार करुन शासनास मंजुरीस सादर करणेस उपवनसरंक्षक, गोंदिया यांना सुचना निर्गमीत करण्यात येत आहेत. |

तहसिलदार
सडक अर्जुनी

Tahasildar Arjuni Morgaon

उप विभागीय अधिकारी
देवरी

अध्यक्ष, जिल्हा पुनर्वसन समिती
तथा जिल्हाधिकारी, गोंदिया

उप विभागीय अधिकारी

उपवनसंरक्षक
गोंदिया वनविभाग, गोंदिया

प्रकल्प अधिकारी तथा
उपवनसंरक्षक
गोंदिया वनविभाग गोंदिया

(91)